www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 276 | वा शनिवार दि. 21 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून
शासनाच्या दरबारात

### मंठा तालुक्यातील पंचायत समिती मंठा.




दैनिक युवक आधार
प्रतिनिधी राजू शिंदे

**पंचायत समिती कार्यालयातील ऑफिस उघडण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या महिला**

# कामावरून परतणाऱ्या चाकरमान्यांचे हाल; ओव्हर हेड वायर तुटल्याने पश्चिम रेल्वेची वाहतूक ठप्प



पश्चिम रेल्वे च्या पालघर रेल्वे स्थानकावर मुंबई कडून अजमेरकडे जाणारी अजमेर एक्सप्रेस तीन नंबर प्लॅटफॉर्मवर येत असताना ओव्हर हेड वायर तुटल्याने पश्चिम रेल्वेची वाहतूक ठप्प पडली आहे. ही सेवा सुरू होण्यासाठी दोन ते तीन तास लागणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. मुंबई कडून अजमेर कडे जाणाऱ्या अजमेर एक्सप्रेस संध्याकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी पालघरच्या ३ नंबर प्लॅटफॉर्मवर येत असताना अचानक ओव्हरहेड वायर तुटल्याने गाडीच्या चालकाने हॉर्न वाजवून सर्वांना सतर्क केले. ओव्हरहेड वायर तुटल्याने मुंबईकडे जाणारी आणि गुजरातकडे जाणारी दोन्ही मार्गावरील लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्या तसेच उपनगरीय लोकल सेवा वेगवेगळ्या स्थानकांवर थांबवून ठेवण्यात आल्या. त्यामुळे पश्चिम रेल्वेची सेवा काही वेळेसाठी ठप्प पडली असून, पालघर डहाणू तालुक्यातून आपल्या घराकडे जाणाऱ्या तसेच मुंबईकडून पालघर- डहाणू या भागातील आपल्या घराकडे जाणाऱ्या चाकरमान्याचे मोठे हाल होणार आहेत. पश्चिम रेल्वेची सेवा ठप्प पडल्याने पश्चिम रेल्वेची दुरुस्तीसाठी येणारी व्हॅन आल्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे दोन ते तीन तास या दुरुस्तीसाठी लागणार असल्याचे रेल्वे सुत्रांनी सांगितले. या घटनेनंतर विविध रेल्वे स्थानकात लोकल आणि लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस थांबवून ठेवल्याने रांगा लागल्याचे चित्र दिसून येत होते.

## हंगाम असूनही प्रवाशांची एसटीकडे पाठ : तिकीट भाडेवाढ, अनियमित सेवा याचा फटका.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ ही महाराष्ट्र राज्यात रस्त्यावरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी स्थापन झालेली राज्य सरकारची कंपनी आहे. तिच्या सेवा आणि वाहने एसटी या रुपाने महाराष्ट्रीय जनतेत प्रचलित आहे. अशा या राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यात दीड हजार नवीन बस दाखल झालेल्या असल्या तरीही यावर्षी एप्रिल ते जून या उन्हाळ्याच्या सुट्टीचा हंगाम असूनही प्रवाशांच्या संख्येत सरासरी २० लाख रुपयांनी घट झाली आहे. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे उत्पन्न मिळाले नाही याला कारण तिकीट भाडेवाढ, अस्वच्छ आगार, वेळेवर सेवा नसणे अशा अनेक कारणांमुळे प्रवाशांनी एसटीकडे पाठ फिरवल्याचे तज्ञांचे म्हणणे आहे. दरवर्षी एप्रिल ते जून हा कालावधी एसटी साठी उत्पन्नाच्या दृष्टीने




महत्त्वाचा असतो. लग्नसराई ,शाळा कॉलेजला सुट्टी, असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात एसटीचे प्रवासी वाढतात याशिवाय पर्यटन स्थळी प्रवाशांचे जाणे येणे या महिन्यात जास्त प्रमाणात असते. यंदा मात्र गर्दीच्या या तीनही महिन्यांमध्ये प्रवासी संख्या सरासरी २०लाखांनी घटली आहे. २४ जानेवारी २०२५ रोजी एसटीचे तिकीट भाडे १५ टक्क्यांनी वाढवण्यात आले भाडेवाडीनंतर उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा होती पण एप्रिलमध्ये ८५ टक्क्यांनी ते मे महिन्यात १२.६ टक्के आणि १५ जून पर्यंत केवळ १२.५ टक्के वाढ नोंदवली आहे. भाडेवाडी मुळे काही प्रमाणात उत्पन्न वाढले असले तरी ते अपेक्षित उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे. तज्ञांचे म्हणणे आहे की एसटीचे ३१ विभाग व २५१ आगारांपैकी अनेक भाग तोट्यात आहेत. ठाणे, पुणे, कोल्हापूर, नागपूर, सोलापूर,आणि छत्रपती संभाजीनगर हे मोठे विभाग सातत्याने तोट्यात असून ते रोखण्यासाठी ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. नफ्यात असलेल्या विभागांचे योगदान ही एकूण आर्थिक स्थिती सुधारण्यास अपुरे पडत आहे. तोट्यातील आगारांना कारणे दाखवा नोटीस पाठवली जाते पण कौशल्य विकास समुपदेशन आणि कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळे वाढीव भाडेवाडी चे फायदे ही एसटीला मिळताना दिसत नाही.

## खोना हॉस्पिटल मंगरुळपीर येथे जागतिक रक्तदानदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न



दैनिक युवक आधार
रिसोड. रणजीत ठाकूर

इंडिया सर्जनस असोसिएशन तर्फे सर्जन सप्ताह व 14 जून रक्तदान दिन साजरा" [ फुले शाहू आंबेडकर ब्लड डोनर व रुग्णसेवा ग्रुप व कांतादेवी डाळ ब्लड बँक यांचे विशेष सहकार्य"] मंगरुळपीर : ८ जून ते १४ जून देशभरात ऑल इंडिया सर्जनस असोसिएशन तर्फे सर्जन सप्ताह साजरा करण्यात आला.त्या निमित्ताने खोना हॉस्पीटल मंगरूळपीर जिल्हा वाशिम मध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

या रक्त दान शिबीराला अनेक तरुण व नागरिकांनी रक्तदान करून सहकार्य केले. "रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान" असून गोरगरीब गरजू रुग्णांच्या सेवेसाठी व जीवनदानासाठी रक्तदान करणे हे काळाची गरज असून रक्तदान हे कुठल्या कंपनीमध्ये अथवा फॅक्टरीमध्ये तयार होत नसून ते मानवाच्या शरीरामध्ये होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी दर 3 ते 4 महिन्याला रक्तदान केले पाहिजे आहे. यावेळी रक्तदानामुळे मानवी शरीराला व जीवनाला नवीन ऊर्जा मिळते. 40 रक्तदात्यानी रक्त दान केले. या शिबिराला स्व.कांतादेवी डाळे ब्लड सेंटर तसेच ऑल इंडिया सर्जनस असोसिएशन व अमरावती सर्जन असोसिएशन व फुले शाहू आंबेडकर ब्लड डोनर व रुग्णसेवा ग्रुप वाशिम महाराष्ट्र च्या सहाय्याने हे शिबीर संपन्न झाले. हे शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी खोना हॉस्पीटल डॉ. संगीता खोना मॅडम, निलेश बाहेती, स्व.कांता देवी डाळ ब्लड बँक वाशिम डॉ. दिगंबर निरगुडे, फुले शाहू आंबेडकर डोनर व रुग्णसेवा ग्रुप वाशिम संस्थापक अध्यक्ष प्रदिप पट्टेबहादूर, डॉ. मो.मुस्सदीक ,श्रीहरी पाबळे,शिवा सोनोने,हरिश पडघन व केतन सुखाडीया, खून हॉस्पिटल संपूर्ण स्टाफ,स्व.कांत देवी डाळ ब्लड बँक चमू, राजा प्रसेनजित संस्था व नेहरू युवा बहूउद्देशीय मंडळ केकतउमरा व अनेक रक्तदाते यांचे विशेष सहकार्य लाभले यांचा लाभला या रक्तदान शिबिरामध्ये तब्बल 40 रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले योगदान दिले. या संपूर्ण शिबिराच्या आयोजन डॉ.संगीता खोना मॅडम यांनी केले होते.

## डीएवी पब्लिक स्कूलमध्ये युनिट टेस्टसाठी मराठीचा समावेश; भाजपच्या पाठपुराव्याला यश


दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

नवीन पनवेलमधील डीएवी पब्लिक स्कूलच्या इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या युनिट टेस्टच्या वेळापत्रकातून मराठी विषय वगळण्यात आल्याच्या तक्रारी पालकांकडून प्राप्त झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने शाळा प्रशासनाकडे ठोस पाठपुरावा केला. यानंतर शाळा व्यवस्थापनाने तातडीने मराठी भाषेचा समावेश करत सुधारित वेळापत्रक जारी केले आहे. भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी शाळा प्रशासनास निवेदन दिले आणि मुख्याध्यापक श्री. घोष यांच्याशी याबाबत चर्चा केली. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर, प्रभाकर बहिरा, राजश्री वावेकर, किशोर चौतमोल, रुपेश नागवेकर, केदार भगत, प्रशांत शेट्ये, महेश राऊळ, भीमराव पोवार, वरुण डंगर, विवेक होन आदी उपस्थित होते. "मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा असून शालेय अभ्यासक्रमातून किंवा परीक्षांमधून तिचा वगळलेला समावेश अत्यंत निषेधार्ह आहे," असे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगत, मराठी विषय युनिट टेस्टमध्ये न समाविष्ट केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला होता. प्रशासनाने याची गंभीर दखल घेत पुढील युनिट टेस्टमध्ये मराठी विषयाचा समावेश करत



सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्यामुळे तात्काळ कार्यवाही केल्याबद्दल शिष्टमंडळाने श्री. घोष यांचे पुष्पगुछ देऊन आभार व्यक्त केले. तसेच पालकांनीही समाधान व्यक्त करत भारतीय जनता पार्टी आणि शाळा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## नांदेड जिल्ह्यांचे पालकमंत्री मा.ना.श्री.अतुलजी सावे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकासकामांच्या संदर्भात बैठक संपन्न



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड – येथे कै. शंकरराव चव्हाण नियोजन भवनाच्या सभागृहात जिल्हा समितीची बैठक मा.ना. श्री.अतुलजी सावे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असता बैठकीदरम्यान जिल्ह्यातील विविध प्रश्न त्यांच्यासमोर अधोरेखित केले. नांदेड जिल्ह्यातील विविध स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा, शैक्षणिक व आरोग्यविषयक मागण्या तसेच पायाभूत सुविधा उभारणीसंदर्भातील प्रलंबित विषयांकडे आपण जातीने लक्ष द्यावे अशी मागणी केली. या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार श्री अशोकराव चव्हाण, खासदार,श्री अजित गोपछडे, जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डीले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, पोलीस अधीक्षक श्री अभिनाश कुमार, आ.श्री प्रतापराव पाटील चिखलीकर श्री.आ हेमंत पाटील, शिक्षक आमदार श्री विक्रम काळे,आ. श्रीजया चव्हाण, आ.श्री राजेश पवार, आ.श्री भीमराव केराम, आ.जितेश अंतापूरकर, आ.श्री बालाजी कल्याणकर, आ.श्री आनंद पाटील बोढरकर, आ.श्री बाबुराव कदम तसेच यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी व विविध शासकीय अधिकारी, पत्रकार बांधव व पदाधिकारी उपस्थित होते.



## माऊली सांस्कृतिक क्रीडा मंडळ निपाणी, मुंबईतर्फे आळंदीत वारकऱ्यांना अल्पोहार वाटप

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर माऊली सांस्कृतिक क्रीडा मंडळ निपाणी, मुंबई यांच्यातर्फे गेल्या दहा वर्षांप्रमाणे यंदाही आळंदी-दिघी रोड परिसरात मोठ्या भक्तिभावाने आणि सेवाभावाने वारकरी बांधवांना अल्पोहार वाटप करण्यात आले. यावेळी कीर्तनसेवा करणारे ह.भ.प. बाळकृष्ण सुतार महाराज, मंडळाचे संस्थापक दत्तात्रय पिंपरे महाराज, अध्यक्ष संदीप उतेकर, तसेच करण नायडू यांच्यासह त्यांचे मित्रपरिवार आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. या सेवाकार्यात पत्रकार भीमराव धुळप, मारुती पारते, एकनाथ उतेकर, अजय जाधव, राम शिंदे, अशोक जांभळे गुरुजी, संपत उतेकर, संतोष जाधव, अंकुश उतेकर, सूरज कदम, अनिल केळगणे, आशिष पारते, सौ. प्रिया गिलबिले, सौ. प्रमिला परब, राजेश्री शिंदे, सुमन उतेकर यांचाही सहभाग लाभला.मंडळाचे सर्व तरुण कार्यकर्ते आणि महिला सदस्यांनीही उत्साहाने सहभाग घेत, वारकऱ्यांची मन:पूर्वक सेवा केली. वारकऱ्यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.



## गिरगावच्या सुप्रसिद्ध चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलचा शानदार प्रवेशोत्सव.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**




16जुन 2025 या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत ढोल ताशांच्या गजरात व औक्षण करून करण्यात आले. प्रवेशद्वारातून आत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास गुलाब पुष्प देण्यात आले. या दिवशी मुंबई परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली होती तरीही विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते याबाबत संस्थेचे अध्यक्ष श्री किशोर रांगणेकर सर व सचिव डॉक्टर गुरुनाथ पंडित सर यांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या प्रवेशद्वारावरच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे ,पर्यवेक्षक श्री. संतोष मांजरेकर,सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## जन्म - मृत्युच्या केसेस जलदगतीने निकाली काढा: किनवट न्यायालय वकील संघाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

मागील अनेक महीन्यांपासून तहसील कार्यालयात प्रलंबित असलेल्या जन्म – मृत्युच्या केसेस जलदगतीने निकाली काढा,ही मागणी घेऊन किनवट न्यायालय वकील संघाच्या शिष्टमंडळाने आज(दि.२०) तहसीलदार रामेश्वर मुंडे यांची भेट घेतली.

यावेळी सकारात्मक भूमिका घेत जन्म – मत्युच्या केसेस लवकरात लवकर निकाली काढण्याचे आश्वासन तहसीलदार रामेश्वर मुंडे यांनी वकील संघाच्या शिष्टमंडळास दिले.यासंदर्भाने त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांस बोलावून आवश्यक त्या सूचना दिल्या.यावेळी शिष्टमंडळात वकील संघाचे अध्यक्ष अड. किशोर मुनेश्वर,अड.हरीभाऊ दर्शनवाड,अड.घुले यांच्यासह काही वकील सहभागी झाले होते.




# पनवेल करांच्या मालमत्ता कर सवलती साठी सत्ताधारी पक्ष सक्रिय

## निवडणूक पुर्वी भाजप शिंदे गटाचे मत्रालयात बैठक सत्र.

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी.**

सिडको वसाहती मधील अडीच लाख मालमत्ता धारकांना सुमारे 65 टक्के मालमत्ता कर सवलत आणि डबल टॅक्स याविषयी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा बैठक होणार

21 मे रोजी माजी नगरसेविका लीना गरड यांनी माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री व नगर विकास मंत्री *श्री एकनाथ शिंदे साहेब* यांच्या माध्यमातून, *खासदार श्री श्रीरंग बारणे साहेब* यांच्या पुढाकाराने, नगर विकास खात्याचे प्रधान सचिव श्री गोविंदराज साहेब यांच्याकडे देण्यात आलेल्या तक्रारीनंतर, दिनांक 28 मे रोजी बैठक लावण्यात आलेली होती. काही कारणाने बैठक पुढे ढकलण्यात आल्यानंतर, आज सायंकाळी *लीना गरड यांच्याच निवेदनावरून आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे* साडेचार वाजता सदरची बैठक मंत्रालय येथे झाली. सदर बैठकीत नगरसेविका लीना गरड व अर्जुन गरड तसेच खासदार श्री श्रीरंग बारणे साहेब, आमदार श्री प्रशांत ठाकूर साहेब आणि , शिवसेना महानगरप्रमुख श्री प्रथमेश सोमन व शिवसेना जिल्हाप्रमुख श्री रामदास शेवाळे हजर होते. तसेच महानगरपालिकेचे वतीने आयुक्त श्री मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व इतर अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत सिडको वसाहतीतील अडीच लाख मालमत्ता धारकांच्या वतीने लीना गरड आणि अर्जुन गरड यांनी खालील नमूद मुद्द्यावर बाजू मांडली आणि महापालिका आयुक्त आणि त्यांची बाजू मांडली. त्यामध्ये खालील प्रमाणे चर्चा झाली. 1. सिडको वसाहतीतील अडीच लाख मालमत्ता धारकांच्या विभागांमध्ये सिडको ने सेवा देऊन सेवाशुल्क वसूल केलेले असतानाही, एक आक्टोबर 2016 ते 31 ऑक्टोबर 2022 पर्यंत महानगरपालिकेने कोणतीही सेवा न देता, एकही रुपया खर्च न करता डबल टॅक्स लावल्याची बाब लक्षात आणून दिली. 2. कलम 129 ए अन्वये सुमारे 65 टक्के मालमत्ता कर सवलतीचा जो लाभ, गावठाण हद्दीतील 31 हजार मालमत्तांना दिला, तो कायद्यात कोणतीही प्रोविजन नसताना सिडको वसाहती मधील अडीच लाख मालमत्ताधारकांना दिला नसल्याची बाब सांगितली. तो विषय प्रधान सचिव साहेबांनी गांभीर्याने घेतला.

3. 500 चौरस फुटाच्या घरांना मालमत्ता कर माफीचा विषय हा राज्य सरकारच्या आधीन आहे 4. शास्ती माफी बाबत प्रधान सचिव साहेबांनी, तात्काळ महापालिका आयुक्त साहेब यांच्या अधिकारात निर्णय जाहीर करण्याची सूचना दिल्या. माननीय खासदार श्री श्रीरंग बारणे साहेब यांनी शास्ती माफीची प्रक्रिया राबविण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पद्धतीचा अवलंब करण्याची सूचना केली डबल टॅक्स आणि सिडको वसाहती मधील अडीच लाख मालमत्ता धारकांचा कलम 129 A चा 65% मालमत्ता कर सवलतीच्या विषयाचे गांभीर्य ध्यानात घेऊन, महापालिका प्रशासनाला, याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी आदेश देऊन, प्रधान सचिव साहेबांनी पुढील बैठक जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्याचे निर्देश दिले... चार-पाच वर्षाच्या मालमत्ता कराविरुद्धच्या लढाईचे पहिले यश शास्ती माफीच्या रूपात आपल्याला मिळाले असून, डबल टॅक्स आणि कलम 129 A ची 65 टक्के मालमत्ता करमाफी, (फक्त आणि फक्त कॉलनी फोरमने लावून धरली,) ती यशस्वी होईपर्यंत लढाई चालूच ठेवणार आणि जिंकणार....
त्यामुळे मालमत्ताधारकाने घाबरून जाऊ नये....

## आम्ही कोकणकर संघटनेच्या वतीने दि.१३ जुलै रोजी "कोकण सन्मान सोहळा २०२५" चे आयोजन...

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**




आम्ही कोकणकर ही संघटनेमध्ये कोकणातील तरुण पिढी एकत्र येऊन गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करत आहेत. आम्ही कोकणकर हि संघटना कोकणातील कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे काम करत आहे कोकणातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे, त्यांना प्रसिद्धी देणे यासारखे महत्वाचे कार्य उपरोक्त संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे

"चला एकत्र साजरा करुया उत्सव कोकण संस्कृतीचा.." हे ध्येय घेऊन सन्मान कोकणचा आपल्या कोकणी माणसाचा या उक्तीनुसार विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार सोहळा रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी सायं ७.१५ वाजता श्री शिवाजी नाट्य मंदिर,दादर मुंबई येथे कोकणातील वेगवेळ्या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती,उद्योजक, अभिनेते, REELS STAR, यांच्या उपस्थिती मोठ्या उत्साहात भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आलेल्या रसिक राजा साठी मनोरंजनात्मक वेगवेगळे धमाल कॉमेडी स्किट , नाट्यकला कृती दाखवण्यात येणार आहे . सदर कार्यक्रम रसिकांसाठी मोफत असून रसिक राजाने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अधिक माहिती व मोफत प्रवेशिकेसाठी ९७७३१४२८१९, ८६५२१४१५६१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन आम्ही कोकणकर या संघटनेतील तरुण वर्गाने केले आहे.या कोकण सन्मान सोहळ्याचे अनमोल क्षण रसिक राजाच्या साक्षीने इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी लिहिला जावा. आपण जास्तीत जास्त रसिक राजाने या सोहळ्याला उपस्थितीत रहावे असे आवाहन श्री कृष्णा येद्रे यांनी केले आहे.

## RTI कार्यकर्ते देवव्रत पाटील यांचा मोठा विजय; कोकण आयुक्त कार्यालयातील द्वितीय अपिलावरील RTI सुनावणी अखेर सर्वसामान्यांसाठी खुली

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा.**



माहिती अधिकार कायद्यास २० वर्ष पूर्ण होत असताना कोकण खंडपिठातील राज्य माहिती आयुक्त कार्यालयातील एक ऐतिहासिक बंद दार मागे सरकवण्यात आले आहे. आतापर्यंत या दालनातील द्वितीय अपिलावरील सुनावण्या केवळ अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी आणि आयुक्त यांच्या उपस्थितीतच घेतल्या जात होत्या. नागरिक, अन्य RTI कार्यकर्ते यांना यामध्ये बसण्यास परवानगी नव्हती. ही अपारदर्शक प्रक्रिया RTI कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांच्या लक्षात आली. त्यांनी ६ महिन्यांपूर्वीच याविरोधात आवाज उठवत संबंधित कक्ष अधिकाऱ्यांकडे चर्चा केली. मात्र, तोंडी मागणी धुडकावून लावण्यात आल्याने पाटील यांनी दि. ६ जून २०२५ रोजी लेखी पत्राद्वारे राज्य माहिती आयुक्तांकडे ठोस मागणी केली. त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, द्वितीय अपिलावरील सुनावणी सार्वजनिक केली गेल्यास नवीन RTI कार्यकर्त्यांना कायद्याच्या कलमांची अंमलबजावणी आणि प्रशासकीय यंत्रणेची फसवणूक ओळखण्यास मदत होईल. या मागणीची दखल घेत अखेर दि. १६ जून २०२५ पासून कोकण खंडपिठातील राज्य माहिती आयुक्तांच्या दालनातील RTI द्वितीय अपिलावरील सर्व सुनावण्या सामान्य जनतेसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत.


या ऐतिहासिक निर्णयामुळे रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील RTI कार्यकर्ते आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा निर्णय म्हणजे माहिती अधिकार कायद्याच्या पारदर्शकतेच्या तत्त्वांना मिळालेला नवा श्वास आहे. देवव्रत पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मानाचा मुजरा.

# "योग हा जीवन भराची प्रेरणा व निरोगी आयुष्य जगण्याचा मार्ग ; आकांक्षा गायकवाड

## " 21 जून आंतरराष्ट्रीय योग दिन"

**दैनिक युवक आधार**
**रिसोड.प्रतिनिधी**
**; रणजीत ठाकूर......**

.. आजच्या धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीत शरीर आणि मन दोन्हींचे आरोग्य जपणे ही मोठी गरज बनली आहे. अशा काळात प्राचीन भारतीय परंपरेतील योग आणि योगासने हे निरोगी आयुष्य जगण्याचा एक प्रभावी मार्ग ठरले आहेत. दरवर्षी २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो. निरोगी आयुष्यासाठी जीवनात दिवसातून फक्त 30 मिनिटे योगाला दिल्यास आरोग्य संकटातून वाचू शकते त्यामुळे आपण सर्वांनी योग करणे गरजेचे असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका




व माय भारत स्वयंसेविका जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त ( मा. शा ) – कु. आकांक्षा गायकवाड यांनी केले. योग हा फक्त शारीरिक व्यायाम नसून, तो मन, शरीर आणि आत्म्याच्या समन्वयाचा मार्ग आहे. 'योग' हा शब्द संस्कृतमधील 'युज्' धातूपासून बनलेला असून, याचा अर्थ 'जोडणे' असा होतो. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्म्याचे एकत्रिकरण.

योगासने म्हणजे शरीराच्या विशिष्ट स्थिती किंवा मुद्रांमधून केल्या जाणाऱ्या कृती. ही आसने केल्याने शरीरातील स्नायू, सांधे, तसेच अंतर्गत अवयवांवर परिणाम होतो. नियमित योगासनांमुळे अनेक प्रकारच्या शारीरिक तक्रारींवर नियंत्रण ठेवता येते, जसे की उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रित होतो,पचनक्रिया सुधारते वजन संतुलित राहते मणक्याचे आरोग्य टिकते संधिवात, पाठदुखी यांसारख्या त्रासांपासून आराम मिळते तणाव कमी होतो एकाग्रता वाढते .निद्रानाशावर मात करता येते.नैराश्य आणि चिंतेपासून आराम मिळतो. तर योगाची एक महत्त्वाची बाब म्हणजे तो कोणत्याही वयोगटातील व्यक्तींना करता येतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत, सर्वजण आपापल्या क्षमतेनुसार योगासने करू शकतात. त्यामुळे योग हा सर्वसमावेशक आरोग्यसाधन आहे. योग हा फक्त एक व्यायामप्रकार नाही, तर तो एक जीवनशैली आहे. योगासने नियमित केल्यास शरीर निरोगी, मन प्रसन्न आणि जीवन आनंददायक बनते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, ही काळाची गरज आहे. असे योग करण्याचे आव्हान राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा प्रतिनिधी तथा आपदा मित्र तथा (जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त मा.शा) तथा युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार राष्ट्रीय सेवा योजना व मेरा युवा भारत स्वयंसेवीका कु. आकांक्षा गायकवाड यांनी केले आहे.

# आल्या वंदा गेल्या नंदा राजरोसपणे चालतो उदगीर शहर पोलिस निरक्षक दिलीप गाडे यांच्या हाद्दीत मटक्याचा धंदा अवैद्य ?

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतीनीधी (बालाजी तेलंगे )**

उदगीर शहर आणि परिसरात मटका मोठ्या प्रमाणात जोर धरू लागला आहे गंमत म्हणजे या मटक्याची घोडदौड कर्नाटक मार्गे तोगरी आणि तोगरी मार्गे उदगीर असा प्रवास चालू असून खुल्लम खुल्ला हा मटका चालू असल्याने झटपट श्रीमंत व्हावे या अपेक्षेने गोरगरीब आणि विद्यार्थी देखील मटका या जुगाराकडे आकर्षित होऊ लागले आहे परिणामतः अनेक गोरगरिबांच्या संसार उध्वस्त होऊ लागले आहेत मात्र मटका किंग मालामाल आणि गोरगरिबांचे हालचाल अशी चर्चा आता चालू आहे मटका किंग हे पोलीस प्रशासनाला चिरीमिरी देऊन मटका चालवत असल्याची ही चर्चा आहे गंमत म्हणजे काही मटका चालकांमध्ये सरळ सरळ पोलीस दादाची भागीदारीही असल्याची चर्चा केली जात आहे जर हे सत्य असेल तर फार भयानक आहे कारण रक्षकच जर भक्षक होऊ लागले तर तक्रार तर कोणाकडे करावी असा प्रश्न पडलेला आहे.




उदगीर शहर पोलीस स्टेशनला अधिकारी म्हणून आलेले दिलीप गाडे हे यापूर्वी उदगीरला असल्याने उदगीरची चांगली माहिती आहे त्यामुळे कायदा सुव्यवस्था डोळ्यासमोर ठेवून या अवैध धंद्याला ते आळा घालतील अशी अपेक्षा होती मात्र उदगीरकरांची ही अपेक्षा चुकीची ठरू लागली आहे तशीच स्थिती ग्रामीण भागातही चालू आहे. एकंदरीत अवैध धंद्याचे आता तोगरी आणि उदगीर हे केंद्र बनत चालले आहेत.

इतर वेळा जिल्हा पोलीस अधीक्षक बेंबीच्या देठापासून अवैधन्याच्या विरोधात मोहीम राबवा असे सांगत असले तरी आता बदली झालेली असल्यामुळे ते देखील मूळ गिळून गप्प आहेत का ? की त्यांना स्थानिक पोलिसांनी आणि दलालांनी पेल्यात उतरवले? अशी ही चर्चा आता जोर धरू लागली आहे. एक मात्र खरे की कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणात उदगीर तोगरी देवणी या भागात मटका जोर धरू लागला आहे. उदगीर शहरात बाजाराच्या दिवशी बाजार करायला येणारे ग्रामीण शेतकरी कष्टकरी हे बाजार करण्यासाठी घेऊन आलेले पैसे मटका जुगारावर लावून हरत असल्याने त्यांचे हाल होत आहे गंमत म्हणजे केवळ मटकाच नाही तर मटक्याच्या नावाने अंदरबहार, चित्तर ओळखलं बक्षीस अशा नावाने देखील जुगार आता फोफावू लागले आहेत. खुलेआम हात चला की करून गोरगरिबांना लुबाडण्याचा राजरोस धंदाच काही लोकांनी चालू केला आहे कायदा सुव्यवस्था आणि शांततेच्या कार्यरत असलेली पोलीस यंत्रणा देखील अशा प्रकाराला नजर अंदाज करत असल्याने अवैध धंदेवाल्यांची हिंमत वाढत चालली आहे. वरिष्ठ पातळीवरून याला आळा घातला जाईल अशी अपेक्षा उदगीरच्या जनतेची आहे स्थानिक पातळीवरील पोलीस प्रशासन एकतर राजकीय दबावा पोटी गप्प असेल नाहीतर चिरीमिरीची लालस त्यांना नजर अंदाज करायला भाग पाडत असेल अशी चर्चा आता रंगू लागली आहे काही असले तरी दाम करी काम वेड्या या लोकउक्ती प्रमाणे दलाल आणि अवैध धंदेवाले बिनधास्तपणे गोरगरिबांना लूट सुटले आहेत आणि पोलीस यंत्रणा मात्र त्यांच्याकडे हेतूतहा कानाडोळा करत आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे असेही बोलले जात आहे.

# तळा कॉलेजमध्ये वाचन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळाचे श्री मनोहर केशव रणदिवे ग्रंथालयामार्फत १९ जून २०२५ रोजी वाचन दिन साजरा करण्यात आला. प्रथमतः डॉ. विनय द. देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. ग्रंथालयांमध्ये भरवण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनामध्ये विविध विषयाची पुस्तके ठेवण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी ग्रंथालयातील विविध पुस्तके हाताळली. त्यानंतर महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री मनोज वाढवळ यांनी कै. डॉ विनय दत्तात्रय देशमुख यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले, डॉ विनय द.देशमुख हे केंद्रीय समृद्धी मत्स्यकीय संस्था मुंबई येथे १९७७ ते २०१४ पर्यंत वैज्ञानिक म्हणून कार्यरत होते. त्यांनी समुद्रातील मासे, कोळंबी, करंदी, आदीवर संशोधन कार्य सुरू होते, अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली, महाराष्ट्र शासनाच्या अनेक समित्यावर सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक जनरलमध्ये ८० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित केलेले आहेत. २०१४ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर ते



ओएनजीसी व बीएनएचएस यासारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये सल्लागार म्हणून काम पाहिले आहे. तसेच द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये सीडीसी कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीवर सदस्य म्हणून कार्यरत होते. त्यांचे १९ जून २०२० रोजी निधन झाले असून या महान वैज्ञानिकास विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## माझ्या शेतकरी राजांचं जीवन

जूनच्या पहिल्या आठवड्यात रखरखत्या उन्हाच्या झळांची तीव्रता कमी झाली.ढग दाटून येऊ लागले.तसा शेतकरी राजा घरातील व इतर लग्न समारंभाधि कामे आटोपून शेतात मशागत करू लागला.उन्हाळ्यात नांगरून टाकलेली काळी आई उन्हाच्या कडक तडाख्याने तापलेली होती म्हणून की काय,बाप वरूण राजाला दया आली असावी आणि ढगांना दाटून येण्यास आमंत्रण दिले.वरूण राजा येईल,या आनंदाने रानातील झाडे- वृक्षवेली नाचू लागले.यासह वीजाही थयथय नाचू लागल्या,अन माझा शेतकरी राजा सुताराकडे जाऊन तिफन, कोळपणं,खुरपे,मोठे खुरपे,सिंकी,वखर काही भागात डवरा म्हणतात,बैलगाडी दुरुस्ती,अशी किरकोळ कामे करून घेऊ लागला. शेतकरी राजासाठी वरून राजाचे आगमन म्हणजे जणूकाही आनंदोत्सवच...!कारण या काळ्या आईच्या भरवशावरच त्याच्या सांसाराचा डोलारा उभा राहतो व उद्याची स्वप्न बघतो. शेतातील मातीचे ढेकळं रिमझिम पावसामुळे थोडीशी ढिसूळ होऊ लागली,त्यात वखर,तिफन फिरवून अगदी भुसभुशीत केली. या भुसभुशीत काळ्या मातींवर जणू,कापूस अंथरला की काय असं छान मऊ वाटायला लागलं.थोड्याशा का होईना पण, वरूण राजाच्या येण्याने उन्हाच्या तीव्रतेची झळा कमी झाल्या अन धुळीनं माखलेली झाडांची पानही धुतली गेली आणि हि सृष्टी हिरवा शालू नेसल्याप्रमाणे भासू लागली. या मंद वाऱ्याने डोलणारी झाडं-वृक्षवेली आनंदाने नाचताना बघून,पशु-पक्षी आनंदाने आकाशातघिरट्या घालू लागली. बगळे,चिमण्या,कावळे, कोकीळ, तसेच फुलपाखरं हि, या झाडांवरून त्या झाडांवर स्वैराचार करताना दिसून येऊ लागली कारण, त्यांनाही या उन्हाच्या तीव्रतेपासून एक सुखद गारवा मिळू लागला असं वाटतंय.जमीन भुसभुशीत झाली. शेतकरी माय-बाप काडी कचरा उचलून बंधाऱ्यावर आणून टाकू लागला. अन शेत-शिवार स्वच्छ सुंदर दिसू लागली.चहुकडे काळ्या जमिनीवर गालिचा अंथरल्यासारखं वाटत आहे. शेतकरी राजासाठी पावसाची चाहूल हि,आनंदाचा क्षण असला तरी जीवाचा घालमेल करणारा सुद्धा आहे. शेतीसाठी लागणारी बी-बियाणे खरेदीसाठी त्याला पैशाची निकड भासते. अशावेळेस,मात्र त्याच्याकडे पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे कुणाकडून तरी उसने, पासने घेऊन किंवा एखाद्या पतसंस्थेकडून, सहकारी सोसायटी कडून व्याज रूपाने कर्ज घ्यावे लागते. वाढती महागाईमुळे वाढलेले बी बियाणे खतांचे भाव यामुळे त्रस्त असतो म्हणून, पोटाला चिमटा देऊन, काटकसर करून,तो पैशाची जुळवाजुळव करताना दिसून येतो. एक एकीकडे कधी पावसाचा वर्षाव होऊन जमिनीचं पोट भरेल सांगता येत नाही.आणि एकीकडे शेत पेरणीचीसामग्रीची जुळवा जुळव या विचारातशेतकरी राजा दिसून येतो. एकदा का जमीन आईचं पावसाच्या पाण्यानं पोट भरलं कि, पेरणी करणं अत्यंत महत्त्वाचे असतं, कारण हिच निश्चित वेळ असते अन्यथा भविष्यातील शेतीमालावर त्याचा परिणाम होताना दिसून येतो. पिक दर्जेदार येत नाही. म्हणून योग्य वेळीच पेरणीला सुरुवात करावी लागते. साधारण जूनच्या पहिल्या ते दुसऱ्या आठवड्यामध्ये आपल्या महाराष्ट्रातील हवामानानुसार पेरणीचा काळ असतो. आणि याच काळात लेकरांच्या शाळेचे नवीन सत्र सुरू होण्याची वेळ असते.लेकरांसाठी कपडेलत्ते घ्याव की शेतीसाठी बी बियाणे,शेती उपयोगाचे अवजार घ्याव? हा गंभीर प्रश्न शेतकरीराजा समोर दत्त म्हणून उभा राहतो.जशी जशी वातावरणात बदल होऊन येणाऱ्या पावसाची चाहूल शेतकरी राजाला लागते,तसतसी तो बी-बियाण्या ची शेती उपयोगी अवजारांची जुळवा जुळव करून बैलगाडी न वावरातल्या छपरातून नेऊन ठेवतो. कारण,भरपूर प्रमाणात पाऊस पडला तर,गावाकडील पांद-रस्ते हे चिखलमय होतात त्यामुळे, गावाकडून वावराकडे बैलगाडी आणि वाहनानं शेत पेरणीच्या वस्तू घेऊन जायला अडचण निर्माण होते. शेतकरी राजा या काळात आर्थिक विवंचनेतून जरी जात असला तरी,त्याच्या मनामध्ये भविष्यातील उत्पन्नाची आणि जगाला पोसण्याची उम्मीद असते.कुटूंबातीलच नाही तर,"जगाचा पोशिंदा" या नात्याने प्रत्येकाच्या ओठी अन्नाचा घास मिळावा याची चिंता असते.हे अतिशय पवित्र कार्य त्याच्या हाती परमेश्वराने सोपविले आहे. म्हणून तो सदाआनंदी आणि उत्साही असतो.या अश्या बिकट परिस्थितीतहि या विशाल हृदयाच्या शेतकरी राजाचे जीवन म्हणजे जुगारातील खेळासारखे असते. आज रोजी तो पावसाच्या भरवश्यावर आपल्या एक-एक रुपयाच्या कष्टाच्या कमईतील पोटाला चिमटा देऊन, काटकसर करून,जमा केलेल्या हजारो रुपयांच्या शेतीपेरणीच्या वस्तू माय माऊलीच्या उदरामध्ये पेरून ठेवतो.आणि तेही सर्व विनाशर्त...! ना कुठले करारपत्र,ना कुठले एग्रीमेंट परंतु,केवळ आणि केवळ परमेश्वराच्या भरवश्यावर आयुष्यातील एवढा मोठा जुगार खेळतो.अहो! येथे शंभर रुपयाचा विमा काढला तर, हजारो नियम अटी लागू असतात.विमाधारकांचेही अनेक प्रश्न असतात. मात्र हा माझा शेतकरी राजा हजार रुपयांचं बी-बियाणं या काळ्या आईच्या उदरामध्ये पेरवून मोकळा होऊन जातो, केवळ अन केवळ "पाऊस-बा"च्या भरवश्यावर....! असा हा माझा शेतकरीराजा पावसाचे ढग दाटून येताना सुखावतो मात्र, त्याचं अंतकरणसुद्धा आतून शेती पेरणीसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदीसाठी लागणाऱ्या पैशासाठी व खर्चासाठी आतून दाटून येतं.पैशाची जुळवाजुळव करतांना तो वणवण भटकतो.त्यासह घरातील गरजा व लेकरांच्या शालेय गरजा भागवण्यात त्याच्या जीवाची घालमेल होते मात्र, तरीही हा "जगाचा पोशिंदा" समस्त जगाला सुखाने अन्नाचा घास मिळावा यासाठी झटत असतो. आपले दुःख लपवून ताठ मानेने जगत असतो.या जगाच्या पोशिंद्याला सलाम..!

**श्री विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**

## पर्यावरण मित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था भारत व पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षदिंडी,वृक्षारोपण

### राज्यस्तरीय निबंध,काव्य स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभही थाटामाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**



पर्यावरण मित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था भारत व पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून पर्यावरण दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धा यांचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवार दि. १९ जून २०२५ रोजी पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार पूर्व येथे संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर शुभम पाटील मॅडम, श्रीमती रजनी बगे मॅडम उपस्थित होत्या. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी पर्यावरण संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.विजय चोघळा, राष्ट्रीय सचिव संगीताताई भेरे मॅडम, राष्ट्रीय कोषाध्यक्ष श्री. प्रदीप चव्हाण, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य व ठाणे जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री. दिनेश चौधरी,वर्तक महाविद्यालयाच्या प्राचार्य शितल कोरडकर मॅडम,मयूर संखे,किरण बनसोडे,श्री.अनंता राऊत ,स.आरती पडवळ ,पर्यावरण संस्थेचे पदाधिकारी,महाविद्यालयाचे प्राध्यापक हेमांगी सावंत,शितल मॅडम,निखिल नाईक यांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयाचा पूर्ण स्टाफ,सर्व विद्यार्थी आणि ज्यांनी निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धेमध्ये एक ते तीन क्रमांक पटकावले ते पुरस्कारार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने झाली.पाहुणे तसेच संस्थेतील शंभर विद्यार्थी यांच्या उपस्थितीत मनमोहक तालासुरात लेझीमच्या साथीने वृक्षदिंडी काढण्यात आली व वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमात पुढील राज्यस्तरीय निबंध स्पर्धेची बक्षीस देण्यात आले.५ वी ते ७ वी

प्रथम- एंजल गणेश नागले मराठा मंदिर हायस्कुल पाली,द्वितीय- कार्तिकी संदीप ओरपे-मराठा मंदिर हायकुल पाली, तृतीय - लावण्या वानखेडे, अमरावती, ८ वी ते १२ वी गट प्रथम - स्वस्ति उमेश नागले मराठा मंदिर हायस्कुल पाली,द्वितीय - क्षताक्षि गजानन पांचाळ न्यू इंग्लिश स्कुल,तृतीय -सिद्धी सुदेश घाटकर न्यू इंग्लिश स्कुल, तर खुला गट मध्ये प्रथम - छाया प्रमोद खराटे ठाणे, द्वितीय- कार्तिका हेमंत पाटील- पालघर,तृतीय - धनश्री अशोक भिलारे -सातारा, आणि उत्तेजनार्थ म्हणून गोतारने सर -पालघर, तसेच काव्य स्पर्धा निकाल खालील प्रमाणे प्रथम -अर्जुन भागा बांबेरे- ठाणे,द्वितीय अक्षता आनंद जाधव -ठाणे,तृतीय -सुरेखा कुलकर्णी -पालघर,अशा प्रकारच्या पुरस्कारार्थी यांचा सन्मान करण्यात आला. श्री. चौघळा सर यांनी प्रास्ताविक सादर केले.तसेच प्रतीक्षा बोर्डे मॅडम यांनी कार्य कार्यक्रमासंदर्भात माहिती सांगितली. गोतारणे सर व अर्जुन बॉम्बे सर यांनी कार्यक्रम संदर्भात मनोगत व्यक्त करत उपक्रमची व या कार्यक्रमाची स्तुती केली.डॉक्टर शुभम पाटील मॅडम यांनी पूर्ण टीमला धन्यवाद दिले व अशाच प्रकारे पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे हे पटवून दिले.या कार्यक्रमासाठी पर्यावरण संस्था सर्व पदाधिकारी पद्मश्री भाऊसाहेब वर्तक विद्यालय सर्व स्टाफ यांनी मोलाचे सहकार्य केले. पावसाच्या सरींच्या वर्षावात हा कार्यक्रम उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आला होता.पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन आणि पर्यावरण संस्थेचं प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सदरच्या स्पर्धांचा आयोजन करण्यात आले असल्याचे श्री. प्रदीप चव्हाण सर राष्ट्रीय कोषाध्यक्ष यांनी आपल्या छोट्याशा मनोगतात स्पष्ट केले. हेमांगी सावंत मॅडम यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल नाईक सरांनी आपल्या सुमधुर आवाजामध्ये केले. त्यांचे देखील धन्यवाद सौ.शितल वर्तक यांनी मांडले व कार्यक्रमाची सांगता केली.

## आदरणीय मंगेश गावंड सरांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार 'प्राप्त

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी / हेमाली पाटील**



'शिक्षक हा ज्ञानाचा दिवा असतो, जो अज्ञानमय अंधार प्रकाशित करत असतो'. असेच विद्यार्थी प्रेमी, उपक्रमशील शिक्षक मंगेश बलदिन गावंड (वशेणी -उरण) आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झाले. मंडणगड तालुक्यातील वेसवी येथील जि. प. शाळेत मागील वर्षी मुख्याध्यापक म्हणून सेवेवर रुजू झाले.त्यांच्या उत्कृष्ट सेवेची दखल घेत वेसवी केंद्राचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना प्राप्त झाला.हा पुरस्कार दरवर्षी वेसवी केंद्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना दिला जातो.. या पुरस्काराची सुरुवात मा. श्री. बशीर परकार सर (केंद्रप्रमुख) यांनी 2023_24 वर्षी सुरु केली. या पुरस्काराचे प्रथम मानकरी मा. श्री राकेश पणदिरकर सर हे होते. 2024- 25 यावर्षी वेसवी केंद्रात सरल पोर्टल द्वारे 17 शिक्षक भरण्यात आले. या शिक्षण सेवकांना हुरूप यावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे, म्हणून यावर्षी चार शिक्षण सेवकांना केंद्रीय 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यामध्ये बाणकोट किल्ला उर्दू शाळेचे मुख्याध्यापक पठाण सर, वेसवी मराठी शाळेचे मुख्याध्यापक मंगेश बलदिन गावंड सर, नारायण नगर शाळेचे मुख्याध्यापक श्री उमेश बाबुराव भोईर सर आणि रानवली शाळेचे मुख्याध्यापक श्री अशोक पांडुरंग पवार सर पुरस्कृत झाले. केंद्रप्रमुख बशीर परकार सर यांनी दूरदृष्टी ठेवून हा पुरस्कार स्वतःच्या खर्चाने शिक्षकांना देण्याचे ठरवले. जेणेकरून दरवर्षी अधिक जोमाने सर्व शिक्षक काम करतील आणि हा पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतील.यामुळे शाळेची प्रगती तर होईलच, त्याचबरोबर शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रगती निश्चितच होईल, आणि मराठी शाळेकडे दुरावलेल्या पालकांचा कळ वाढेल.त्यामुळे पुरस्कार प्राप्त शिक्षकांसह केंद्रप्रमुख सरांच्या कार्याला सलाम. मंगेश गावंड सरांना वेसवी केंद्राचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याचे कळताच त्यांच्यावर शुभेच्छाचे वर्षाव होत आहे. मार्गदर्शक राकेश पनदिरकर सर, सहकारी,कुटुंबीय, मित्रपरिवार व हितचिंतकांचे त्यांनी आभार मानले.

## माणगाव तालुक्यात प्राथमिक शिक्षकाने घालून दिला इतर सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आदर्श..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

माणगावः- माणगांव तालुक्यातील प्राथमिक शिक्षक दत्ताराम शिर्के यांनी आपला मुलगा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विकास कॉलनी या शाळेत इयत्ता पहिली मध्ये दाखल करून इतर सरकारी कर्मचाऱ्यांनी आपलाही मुलगा किंवा मुलगी जिल्हा परिषदेमध्ये दाखल करून घ्यावी असा आदर्श आज घालून दिला. श्री व सौ शिर्के ते दोघेही सरकारी नोकर असून आपलाही पाल्य आपल्या सरकारी शाळेत शिक्षण घेतलं पाहिजे या उदात्त हेतूने प्रेरित होउन त्यांचा चिरंजीव कुमार चित्रांश दत्ताराम शिर्के त्याला पहिली मध्ये दाखल केला आहे त्यांचा मोठा चिरंजीव कु.प्रबोध शिर्के असाच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकून यावर्षी दहावी बोर्ड परीक्षेत 98.20 गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. तरी इतर सरकारी कर्मचारी यांनी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या मुलाला किंवा मुलीला सरकारी शाळेत दाखल करून जिल्हा परिषदेच्या शाळेतील घटणारी पट संख्या थांबवु शकतील हीच अपेक्षा जनसामान्यांकडून व्यक्त होताना दिसत आहे.




## युवासेना उपजिल्हा प्रमुख कारंजा-मानोरा पदी नितीन अढाव यांची नियुक्ती.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



शिवसेना वर्धापन दिनाचे औचारित्य साधून युवासेना-शिवसेना वतीने

नितीन अढाऊ यांची युवासेना उपजिल्हा प्रमुख कारंजा-मानोरा पदी युवासेना विभागीय सचिव सागर भाऊ देशमुख अमरावती यांच्या आदेशानुसार निवड करण्यात आली.यावेळी जिल्हाप्रमुख जुबेरभाई मोहनावाले व अर्जुन भीमराव सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. नितीन अढाव हे पक्षाचे कट्टर कार्यकर्ते आणि अनेक लोकांना मदत करणारे आणि गावातील आणि इतर समस्या सोडवण्यात तत्पर राहतात तसेच जनतेच्या समस्या गावातील समस्या प्रश्न खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या कडे नेहमी मांडत राहतात त्यांच्या कार्याची दखल पक्षा ने घेत त्यांना मोठी जबादारी सोपावली आहे प्रसंगी युवासेना जिल्हा प्रमुख जुबेर भाई मोहनावले विधानसभा सह संपर्क प्रमुख विवेकभाऊ नाकाडे, नितीन अढाव,अमोल ढेकळे,जय राऊत,शिवा गावंडे,अभिजीत इंगोले,शिवम चौधरी,भूषण सुर्वे सर्व युवासेना वाशीम जिल्हा व मंगरुळपीर तालुका पदाधिकारी बहुसंख्य उपस्थित उपस्थित होते.

## पुण्य नगरी आज भारावली माऊलीच्या पालखीचे पुण्यात आगमन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

पुण्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे आगमन झाले असून ह्या भव्य दिव्य सोहळ्यात सहभागी होणं म्हणजे नशिबच लागते. पांडुरंगाच्या आशीर्वादाने प्रत्येक सामान्य माणूस असो व श्रीमंत पालखी दर्शना साठी येतातच श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पुण्य नगरीत आगमन झालेली काही दृश्य आपणास दाखवली जात आहे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पवित्र प्रारंभप्रसंगी साक्षीदार होण्याचं भाग्य लाभलं. माऊलींच्या वारी सोहळ्याची शेकडो वर्षांची परंपरा आणि या परंपरेचा भाग होता येणे, हे निश्चितच आत्मिक समाधान आणि अध्यात्माची सर्वोच्च अनुभूती देणारे क्षण आहेत. वारी ही केवळ एक परंपरा नाही, ती आत्मिक उन्नतीची वाट आहे. ती भक्ती, समानता आणि आत्मभान शिकवते.



वारकरी संप्रदायाच्या संस्कारात टाळ-मृदंग, अभंग आणि "ज्ञानोबा-तुकोबा"चा जयघोष हा जीवनाचा अविभाज्य भाग होत असतो. आज त्याच भक्तिपंथाच्या सर्वोच्च उत्सवाला अर्थात वारीला सुरुवात करताना मन भारावून जात सध्या पालखी दर्शना साठी पुण्यात भाविकांची गर्दी पहायला मिळत आहे

## नागोठणेकरांच्या भावनांशी खेळू नका अन्यथा मोठा उद्रेक होईल – किशोर जैन

### पुर,लाईट व महामार्ग संदर्भात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिला इशारा

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



बाळासाहेब ठाकरे ग्रामसचिवालयातील ग्रामपंचायत कार्यालयातील कै.शैलेंद्र देशपांडे सभागृहात शुक्रवार 20 जून रोजी माजी जि.प. सदस्य किशोर जैन यांनी सरपंच सुप्रिया महाडीक,उपसरपंच अखलाक पानसरे.माजी सरपंच डॉ.मिलिंद धात्रक, माजी पं.स.सदस्य संजय भोसले व मजीत लांबते यांच्या समवेत शहरात सतत येणारा पुर, वारंवार जाणारी लाईट व महामार्गाबाबत घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत नागोठणेकरांच्या भावनांशी खेळू नका अन्यथा मोठा उद्रेक होईल व नागोठणेकर जनता रस्त्यावर उतरून जन आंदोलन करेल असा इशारा प्रशासन व संबंधित खात्यांना दिला. पत्रकार परिषदेत किशोर जैन यांनी सांगितले की, पावसाळ्यात सतत येणारा पुर – नागोठणे शहर व परिसर हा पावसाळ्यात कायम पाण्यामध्ये असतो.त्यामुळे 1989 पासूनची नदीला संरक्षण भिंत असावी ही आमची मागणी आहे. याकडे प्रशाकीय अधिकारी गांभीर्याने लक्ष देत नाहीत. पुर आला की याची आठवण होते.संरक्षण भिंत बांधण्याचा नागोठणे आयटीआय ते रिलायन्सकडे जाणारा ब्रिजपर्यंतचा खर्च कोट्यावधी रूपयांचा असून इन्स्टिमेंट फक्त एक कोटीचा काढला आहे. सदर भिंतीबाबत योग्य इन्स्टिमेंट काढून नदीची खोली वाढविणे व निदान साधे लहान पुर येऊ नये यासाठी तात्काळ तरतूद करावी. तसेच पुर काळात पूरग्रस्त नागरिकांना तात्पुरते राहण्यासाठी हॉल बांधावा ही मागणी पी.डब्ल्यू.डी.खात्याकडे केली असून,त्यासाठी ग्रामपंचायत जागा उपलब्ध करून देईल.याकडे राजकीय नेते व प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. दर वर्षी होणारी आपत्कालीन काळात उपाय योजनेबाबत होणारी सभा गेली तीन चार वर्षे संबंधित खात्याने घेतली नाही. ती घेऊन नदीकिनारी असलेल्या लोकांच्या समस्या समजावून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय महामार्ग- राष्ट्रीय महामार्ग तयार करताना नागोठणेकर जनतेला विश्वासात घेतले नसून शहरात येणारा रस्ता,गटारे याबाबत कोणतेही नकाशे दाखविले नाही.पावसाळ्यात काम चालू असताना पर्यायी गटार व रस्त्याचे योग्य नियोजन ठेकेदारांनी न केल्यामुळे आज जोगेश्वरी नगर व बाळासाहेब ठाकरे नगर पाण्यात आहे. याला ठेकरेदार व संबंधित अधिकारी जबाबदार असून त्यांना नियोजनाबाबत ग्रामपंचायतमध्ये बोलावले असता ते येत नाहीत. तसेच महामार्गावर सतत अपघात होतात पण मदत कोणतीही मिळत नाही ही आपली शोकांतिका आहे. सतत जाणारी लाईट- जरा पाऊस आला की लाईट जाणे नित्याचे झाले असून,पोलावर तारा लटकणे,झाडांच्या फांद्या तुटणे,वारंवार तारा तुटणे,पाऊस वारा आला की अचानक लाईट जाणे हे होऊ नये यासाठी नियोजन महत्वाचे असून या नियोजनाबाबत महावितरणाचे दोन तीन वर्षांनी प्रस्ताव होत असतात.त्याचे योग्य नियोजन करून कायम स्वरूपी लाईट जाणार नाही यासाठी उपाय योजना होणे गरजेचे असल्याची माहिती सांगून वरील सर्व बाबींचा प्रशासन, संबंधित अधिकारी व खात्याने गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर उपाय योजना करावी. जनतेचा अंत पाहू नका,त्यांच्या भावनांशी खेळू नका अन्यथा मोठा उद्रेक होईल.यावर योग्य उपाय योजना झाली नाही तर विभाग व नागोठणेकर जनता थोड्याच दिवसात रस्त्यावर उतरून जन आंदोलन करणार असल्याचा इशारा शेवटी किशोर जैन यांनी दिला. यांची उपस्थिती- यावेळी ग्रा. पं.सदस्य- ज्ञानेश्वर साळुंखे, अड.प्रकाश कांबळे व सचिन ठोंबरे,ग्रा.पं. सदस्या- शबाना मुल्ला, दिलनवाज अधिकारी, भाविका गिजे,अमृता महाडिक व पूनम काळे यांच्यासह मोहन नागोठणेकर,धनंजय जगताप, संजय काकडे,भरत गिजे, अनिल महाडिक, जितेंद्र जाधव, सतीश पाटील, जोयब कुरेशी तसेच नागरिक उपस्थित होते.

## शेकापचे युवा कार्यकर्ते आकाश भगत यांच्या वाढदिवसानिमित्त साडी, चित्रकला किट आणि खाऊ वाटप

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

शेतकरी कामगार पक्षाचे युवा कार्यकर्ते आकाश भगत यांच्या वाढदिवसानिमित्ताने नौपाडा, कामोठे येथील महिलांना साडी वाटप करण्यात आले आणि लहान मुलांना चित्रकला किट व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, गौरव पौरवाल, पंडित गोवारी, एडवोकेट सिद्धार्थ साळवे, कॅप्टन चिरंजीव, रूपाली धीवर, सुनील भेंडे, रमेश गोरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, नाना भगत, राजेश भगत, ज्ञानेश्वर गायकर, संतोष म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, आकाश म्हात्रे यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे अनेक कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.



# रिठद येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त ग्राहक प्रबोधनसभा संपन्न !

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत ठाकूर**

ि.२० जुनं २०२५ रोजी रिसोड तालुक्यातील रिठद येथे दि.अकोला –वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड अकोला या बॅकेने ११६ वर्षांची अविरतपणे सेवा ग्राहकांना/ शेतकऱ्यांना दिली.आज रिठद येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त ग्राहक प्रबोधन सभा आयोजित केली. सहकारातून समृद्धी निर्माण करने व सहकाराला बळकटी प्रदान करने त्या दृष्टीने ग्राहक प्रबोधन सभेचे आयोजन रिठद येथील संत गजानन महाराज सभागृहात करण्यात आले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व माजी उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष वामनराव किसनराव देशमुख ,तर कार्यक्रमाचे उद्घाटक व मार्गदर्शक तथा बँकेचे संचालक व रिसोड विधानसभेचे आमदार अमित सुभाषराव झनक होते .तर विशेष उपस्थिती जेष्ठ व्यक्तीमत्व नारायणराव दगडूजी बोरकर,जी.पी.साबळे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रिसोड, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इतर मान्यवरामध्ये बबनराव गारडे, आकातराव सरनाईक, आत्माराम आरु, नारायण आरु, संजय शिंदे, राजाराम आरु,गजानन आरु, सुभाष बोरकर, रामकिसन पाटील इंगोले, पंचफुला प्रल्हाद अंभोरे, सरनाईक साहेब (सेवानिवृत्त डि वाय एस पी) , रावसाहेब देशमुख यांची मंचावर उपस्थिती होती. या सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.हा कार्यक्रम रिठद येथील संत गजानन महाराज सभागृह या ठिकाणी दि.२० जुन रोजी दुपारी १२.३०मी कार्यक्रम सुरु झाला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिसोड बँकेचे तालुकाप्रमुख एसपी तलवारे यांनी सांगितले की सहकार्याशिवाय नाही उद्धार, आणि संगणकीकरण, प्रत्येक सोसायटीला ऑफिस साठी चार लाख रुपये डेटा कलेक्शन इत्यादी माहिती त्यामध्ये साठवली जाते व ग्राहकाला आपण केलेले व्यवहार पैसा जमा इत्यादी माहिती यामधून मिळण्यासाठी संगणीकरण केले आहे. केंद्र सरकारच्या धोरणानुसार सहकार क्षेत्र ग्रामीण भागावरच याचे भवितव्य अवलंबून आहे. या तालुक्यात आंतरराष्ट्रीय ग्राहक प्रबोधनानिमित्त पाच मेळावे आयोजित केले आहेत. या ग्राहक दिनानिमित्त अभियान वक्तृत्व




स्पर्धा, आयोजित केल्या जातात, ग्राहक करिता पाच लाख विमा संरक्षण आणि बँक सुद्धा ५४ लाख विमा संरक्षण स्वतः काढते. देशात सहकाराच्या ३५२ शाखा आहेत. बारा लाख आपल्या को-ऑपरेटिव्ह बँकेचे खातेदार आहेत. आपल्या बँकेने दहा तक्रार समित्या या गठीत केले आहेत. अमृत कलश योजना ,इच्छापूर्ती योजना, इत्यादी योजना आपली अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या योजना राबवते. असे बोलतांनारिसोड बॅकेचे तालुका प्रमुख एस.पी.तलवारे यांनी सांगितले. दरम्यान रिठद शाखेची जागा उपलब्ध करून दिली यासाठी जेष्ठ व्यक्तिमत्व नारायणराव बोरकर यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक आमदार अमित झनक व वामनराव देशमुख यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या बँकेचे विशेष खातेदार म्हणून विमल सावळे व आत्माराम सावळे यां कुटुंबाचा शाल व पूष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या तालुक्याचे पालक शाखाधिकारी यांनी डिजिटल बाबत माहिती दिली. त्यामध्ये पैसे काढण्यासाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीला पीन नंबर देऊ नका. नाहीतर आपले खाते रिकामे होऊ शकते. अशी कोणतीही घटना घडल्यास तात्काळ आपल्या बँकेला कळवा. व टोल फ्री क्रमांकवर आपली तक्रार मांडू शकता. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष वामनराव देशमुख यांनी बोलतांना सांगितले की सहकार वर्ष हे जगामध्ये सर्वत्र साजरे होत आहे. सभासद शेतकरी यांच्या उपस्थिती सभासद व शेतकरी यांच्या उपस्थितीमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि ग्राहक मिळून प्रबोधनसभा आयोजित करावयात असे भारताचे गृहमंत्री यांनी आवाहन केले आहे. या सहकाराची मुहुर्तमेढ महाराष्ट्राने महाराष्ट्रातच रोवली आहे. जसे की साखर कारखाने सूतगिरण्या, सेवा सहकारी सोसायटी इत्यादी. शेती विकासासाठी कर्ज. सध्या स्थितीत १०,००० शेतकरी थकीत आहेत. त्यांचे ७३ हजार कोटीचे कर्ज बाकी आहे. यासाठी २०१० पासून च्या थकीत असलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण व्याज माफ करण्याचा स्वनिधी मधून बँकेने ठराव घेतला आहे. त्यासाठी सातशे कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. बॅकेचे ७३ हजार कोटी कर्ज येणे बाकी असले तरी तीन कोटी कर्ज शेतकऱ्यांनी आपले कर्ज भरले आहे. यानंतर समारोपीय भाषण आमदार व बँकेच्या संचालक अमित सुभाषराव झनक यांनी शेवटी बोलतांना सांगितले की ह्या बँका विश्वासावर चालतात हा भागातील व्यक्ती व परिसर सुशिक्षित कर्मचाऱ्यांचा व शेतकऱ्यांचा आहे. आपल्या सर्व वडीलधारी मंडळी मुळेच नानासाहेब सपकाळ ,दादासाहेब कोरपे यांनी आपल्या भागात शाखा निर्माण केल्या. शाखेमध्येच आपलेच कुणीतरी नातेवाईक जसे की देव्हडे साहेब, कोकाटे साहेब इत्यादी लोक या अशा शाखेमध्ये काम करतात त्यामुळे आपल्याला आपला माणूस म्हणून कोणतीही अडचण येणार नाही!, असे यावेळी सांगितले. सध्या प्रत्यक्ष शेतकरी कर्जमाफीच्या गर्तेत अडकला आहे. कर्ज माफीसाठी सध्याचे सरकार नियम लावणार असल्याने कुटुंबात एकालाच कर्जमाफी मिळेल. असा प्रकार सध्या शासनामध्ये चालू आहे .त्यामुळे जे शेतकरी कर्मचारी आहेत, इन्कम टॅक्स भरतात.अशा लोकांनी आपले कर्ज नियमित करून घ्यावे. त्यांना सरकार कर्ज माफ करणार नाही. अशी सध्या परिस्थिती आहे. या जून २०१० पासून ज्यांचे कर्ज थकीत आहे त्यांना व्याज माफ केले जाईल आपण सर्व समजदार आहात. आपण मुद्दल रक्कम भरावी अशी विनंती संचालक म्हणून थकीत ग्राहकांनाआमदार अमित झनक यांनी केली आहे. रिठद शाखेत अडीच कोटींची वसुली झाली आहे व यानंतर ग्राहकांना तीन लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याचा मानस आहे.आपल्या अकोला -वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा माणूस आपलाच माणूस आहे. त्यामुळे व्यवहार करण्यात कोणतीही अडचण येत नाही.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिसोड तालुक्यातील एस. पी. तलवारे तालुकाप्रमुख रिसोड, पी.एन. जाधव मार्केटिंग अधिकारी वर्ग - १, आर.टी मस्करे पालक शाखाधिकारी रिसोड, रिठद शाखेचे शाखाधिकारी बि.आर. नागपूरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. व सोबतच सहकारी म्हणून प्रवीण एन.देव्हडे निरिक्षक,रसीक सरनाईक, गजानन बाजड, भानुदास धांडे,पवण पारडे, संतोष राऊत,भारत देशमुख,विश्वनाथ साखरे, भास्कर मेहकरकर ,यांनी परिश्रम घेतले.व कार्यक्रम यशस्वी झाला.यावेळी परिसरातील सर्वच सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष ,संचालक व शेतकरी, ग्राहक हे मार्गदर्शन ऐकण्यासाठी उपस्थित होते. हा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व उपस्थित ग्राहक मंडळी यांना चहा व नाश्ता देण्यात आला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रिठद येथील दि.अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखाधिकारी बि.आर. नागपूरकर यांनी केले.

## 'गोळप कट्टा' वर दि. २१ जून रोजी प्रभाकर एकल यांची मुलाखत...

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरीः- (प्रमोद तरळ)**

'गोळप कट्टा' चा ६८ व्या कार्यक्रम शनिवार दि २१ जून २०२५ रोजी सायं ६ ते ७.३० या वेळेत पाटणकर कार्यालय, फिनोलेक्स फाटा,गोळप येथे होणार आहे कट्टातर्फे होणाऱ्या संवादात्मक कार्यक्रमात मूळ सातारा जिल्ह्यातील असलेले मात्र खडतर परिस्थितीमुळे चौथी इयत्ता झाल्यावर रत्नागिरी येथे १२ वर्षे कापड दुकानात काम केलेले, त्यानंतर गेली ३५ वर्षे रत्नागिरी मधील राम आळी ऊन पाऊस,थंडी मध्ये रोज १२ तास उभे राहून कपडे विकण्याचा व्यवसाय करणारे, व्यवसायात चिकाटी व अपार मेहनत करत गावाला शेती, रत्नागिरीत घर, दुकान विकत घेतानाच लग्न, स्वतःचे नंतर तीन मुलांचे पालनपोषण ते त्यांच्या लग्नापर्यंतची जबाबदारी पार पाडणारे कष्ट हाच यशाचा पाया असे सांगणारे आणि बेरोजगार, निराश युवकांसमोर आपला आदर्श ठेवणारे श्री प्रभाकर एकल यांचा जीवनप्रवास मु ला ख ती तू न सर्वांसमोर ठेवण्यात येणार असल्याचे मुलाखतकार अड अविनाश काळे यांनी सांगितले सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे




## हिंदी नकोच,मनसेकडून शाळांना निवेदन;घाटकोपरमध्ये राज ठाकरे यांच्या आदेशाची अंमलबजावणी

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज);**

इयत्ता पहिलीपासून ते तिसरीपर्यंत सक्तीची भाबातमी हायलेट करा षा म्हणून 'हिंदी' लागू करण्याच्या निर्णयाला मनसेने तीव्र विरोध दर्शवत कारवाई सुरू केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मनसेचे घाटकोपर पश्चिम विभाग अध्यक्ष गणेश चुक्कल यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर पश्चिम मधील विविध शाळांमध्ये निवेदन देण्यात आले.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये



सक्तीच्या हिंदीला विरोधकरण्या संदर्भातील पत्रक घाटकोपर पश्चिम मधील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष भेटून मनसे पदाधिकारी यांच्याकडून देण्यात आले.यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी सर्व शाळांच्या मुख्यध्यापकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका समजावून सांगितली.यावेळी शिक्षकांनी ही शासनाच्या हिंदी सक्तीच्या निर्णयाला विरोध दर्शविला. सदर प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना घाटकोपर (प) म.न.वि.से मा.विभाग अध्यक्ष समीर भाई सावंत,उपविभाग अध्यक्ष विजय परब,महाराष्ट्र सैनिक चेतन भटकर,मंगेश सावंत,म.न.वि.से उपविभाग अध्यक्ष तेजस भालेकर,म.न.वि.से विभाग सचिव अर्जुन आसोलकर,उपशाखा अध्यक्ष श्री.चेतन पटेल,अमित काळोखे,सागर गुंजाळ आणि असंख्य महाराष्ट्र सैनिक यावेळी उपस्थित होते.

## मोठे दर्गा मागे महापालिकेत कामासाठी येणाऱ्या लोकांसाठी पार्किंग उपलब्ध करून देण्याची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**

पनवेल शहरातील मोठ्या दर्गा मागे असलेल्या मोकळ्या जागेत महापालिकेत कामासाठी येणाऱ्या लोकांसाठी पार्कींगची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

आज महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख प्रविण पोपटराव जाधव, विभागप्रमुख जुनैद पवार, विभागप्रमुख प्रशांत नरसाळे, उपशहर संघटीका उज्वला गावडे, विभाग संघटीका अश्विनी देसाई, उपविभागप्रमुख प्रदीप माखीचा, शाखाप्रमुख मयरुेश पाटील यांच्यासह शिवसैनिक यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना शहरप्रमुख प्रवीण जाधव यांनी सांगितले की, पनवेल महानगर पालिकेत खूप लोक कामानिमित्त येतात आणि कार कुठेही पार्क करतात. पालिके जवळ खूप ट्रॅफिक होते त्यामुळे स्कूल बस, ट्रक, तसेंच सर्व वाहनाना त्रास होतो. तरी पालिकेत येणाऱ्या लोकांनी मोठी दर्गा मागे पार्किंग करावयास सांगावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्याचप्रमाणे असे जुन्या कोर्ट जवळ पालिकेचे सार्वजनिक शौचालय आहे ते नागरिकांना वापर करायला खुले करावे अशी मागणीचे पत्र देण्यात आले.



## अनसिंग मध्ये सार्वजनिक ठिकाणी अवि भांदुर्गे यांच्या घरासमोर कचराच कचरा.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम जिल्ह्यात वाशिम तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले अनसिंग ग्रामपंचायत येथे संत सावता माळी चौकात अविनाश भांदुर्गे. यांच्या घरासमोर सार्वजनिक ठिकाणी साचले कचऱ्याचे ढिगारे. अनसिंग ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्रमांक 4.मध्ये. नालीमध्ये बऱ्याच दिवसापासून कचरा सडलेला आहे. त्यामुळे संत सावता माळी चौकामध्ये सामान्य जनतेला खूप त्रास होत आहे. त्या कचऱ्यापासून त्या परिसरातील बरेच लोक



अनसिंग येथील संत सावता माळी चौकातील रहिवासी अविनाश भांदुर्गे यांनी दिले कचऱ्याबाबत ग्रामपंचायतला निवेदन.

आजारी पडत आहेत.त्यामधे डेंग्यू ताप येणे तसेच अन्य आजाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे.या परिसरातील लहान मुले वृद्ध आणि इतर नागरिक यांचे अंग खाजवत आहे.तसेच त्वचेचे त्रास होण्यास सुरुवात झाली आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावरील सरपंच ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्मचारी संत सावता माळी चौक अनसिंग येथील कचऱ्याच्या ढिगाची तात्काळ दखल घेऊन त्वरीत कारवाई करून कचऱ्याची विल्हेवाट लावावी. अन्यथा संत सावता माळी चौक येथील नागरिकाद्वारे हा सर्व कचरा ग्रामपंचायत कार्यालय आंदोलन छेडण्यात येईल. असा थेट इशारा अनसिंग येथील संत सावता माळी चौकातील नागरिकांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# खारघर वासीयांच्या गळ्याचा घोट घेणारे वाईन शॉप चालू देणार नाही- आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

खारघर वासीयांच्या गळ्याचा घोट घेणारे वाईन शॉप चालू देणार नाही. तसेच येत्या अधिवेशनामध्ये या विषयी आवाज उठवणार अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये दारूबंदी करण्यासाठी पुकारण्यात आलेल्या आंदोलनात दिली. खारघरमधील सेक्टर ६ येथील शहा आर्केड सोसायटीची कोणतीही अधिकृत परवानगी नसताना गोल्डन कॉइन वाइन मार्ट हे दारू विक्रीचे सुरु करण्यात आले आहे. या विरोधात संघर्ष संस्थेच्या माध्यमातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनात खारघरवासी तसेच सर्व पक्षीय नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले. या आंदोलनामुळे गोल्डन कॉइन वाइन मार्ट तसेच जेजेस रसोई या रेस्ट्रॉरंट अ‍ॅण्ड बारने बांधलेले अनधिकृत बांधकाम पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पाडण्यात आले. खारघर हा शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैचारिकदृष्ट्या विकसित होत असलेला परिसर आहे. येथील नागरिकांनी अनेक वेळा




खारघरला दारूमुक्त झोन घोषित करण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर, रहिवासी आणि सामाजिक संस्थांचा विरोध असतानाही वाईन शॉप सुरु केले आहे. खारघर संघर्ष समिती, लोकप्रतिनिधी आणि रहिवासी संघटनांकडून शासन दरबारी सातत्याने दारूबंदी बाबत पाठपुरावा सुरु आहे. मात्र, १४ जूनला शहा आर्केडमध्ये वाईन शॉप सुरु झाल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी तीव्र निषेध करत, वाईन शॉप त्वरित बंद करण्यात यावे आणि खारघरला कायमचा दारूमुक्त झोन घोषित करण्यात यावे, अशी मागणी केली आहे. खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. शहरामध्ये विविध माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालये अस्तित्वात असून खारघर शहराची नोंद नो लिकर झोन अशी अनेक वर्षांपासून आहे. मात्र असे असतानाही खारघरमध्ये वाईन शॉप सुरु करण्यात आले आहे. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाइनशॉपची परवानगी रद्द करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांना पत्र दिले आहे. या पत्रात त्यांनी म्हंटले आहे की, खारघर येथील नागरिकांचा सुरुवातीपासूनच खारघर मध्ये दारू दुकाने आणि दारू बार येण्यास सक्तविरोध आहे. खारघर मध्ये दारूबंदी विषयी अनेक आंदोलने, निदर्शने झालेली आहेत. जानेवारी २०२५ पासून संघर्ष संस्थेच्या माध्यमातून दारूमुक्त खारघर शहर घोषित करावे म्हणून शासनाकडे मागणी केली असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जन आंदोलन सुरू केले आहे. गोल्डन कॉईन वाईन मार्ट हे नवीन वाईन शॉप सेक्टर ६ येथे उघडण्यात आले आहे. या वाईन शॉपला सोसायटी किंवा पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समजते. सदर वाईन शॉपला परवानगी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी अशी येथील नागरिकांची मागणी आहे. तरी खारघर येथील गोल्डन कॉईन वाईन मार्ट या वाईन शॉपला देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात यावी असे अधोरेखीत केले होते. दरम्यान शुक्रवारी संघर्ष संस्थेच्या माध्यमतून खारघरमध्ये दारुबंदी साठी सर्वपक्षीय आंदोलन काढण्यात आले. यावेळी गोल्डन कॉईन वाईन मार्टने बांधलेले अनधिकृतपणे बांधण्यात आलेले शेड माहापलिकेच्या वतीने पाडण्यात आले. त्यानंतर जेजेस रसोई या रेस्टॉरंट ॲण्ड बारने बांबूचे शेड बांधण्याची परवानगी असतानाही त्यांनी लोखंडी बांधकाम काम केले होते. त्याविरोधात आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील यांनी आक्रमक भुमीका घेत जाब विचारला तसेच अनधिकृतपणे बांधण्यात आलेले बांधकाम महापालिकेच्या माध्यमातून पाडले. यावेळी आमदार विक्रांत पाटील यांनी जनतेच्या भावनांना न्याय देण्यासठी जो काही संघर्ष करावा लागेल तो संघर्ष करू असे प्रतिपादन दारुबंदी साठी पुकारण्यात आलेल्या आंदोलनावेळी दिली. या आंदोलनात जिल्हा सचिव ब्रीजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटिल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नीलेश बाविस्कर, नरेश ठाकुर, अभिमन्यु पाटील, शत्रुघ्न काकडे, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, संतोष शर्मा, मंडल उपाध्यक्ष किरण पाटिल, अमर उपाध्याय, समीर कदम, निर्मला यादव, प्रिया दळवी, जुमा चक्रबर्ती, उपाध्याय संजय घरत, कीर्ति नवघरे, अजय माळी, शैलेन्द्र त्रिपाठी, अशोक जांगिड़, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, संघर्ष संस्थेचे पदाधिकारी, सदस्य तसेच खारघर मधील नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शांताराम चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे गुहागर तालुक्यातील मासु,शीर,आबलोली, सडे जांभारी, पाचेरी येथील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**गुहागरः- (प्रमोद तरळ)**

दि.१६ जून म्हणजे शाळेचा पहिला दिवस उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर मुले शाळेत येतात याच पहिल्या दिवशी समाजसेवक राजेश मासवकर यांच्या शांताराम चॅरीटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून गुहागर तालुक्यातील आदर्श प्राथमिक शाळा मासु शाळा क्रं.१,आदर्श प्राथमिक शाळा शीर शाळा क्रं.१,आदर्श प्राथमिक शाळा आबलोली शाळा क्रं.१,
आदर्श प्राथमिक शाळा सडे जांभारी शाळा क्रं.१,
आदर्श प्राथमिक शाळा पाचेरी सडा शाळा क्रं.१,
या शाळेतील एकूण २०० विद्यार्थ्यांना रेनकोट, इतर शैक्षणिक साहित्य तसेच शाळेसाठी स्टेशनरी भेट देण्यात आले याशिवाय प्रत्येक शाळेतील शिक्षकवृंदाला छत्री आणि पेन प्रेमपूर्वक भेट दिली. शांताराम चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून समाजसेवक राजेश मासवकर करत असलेल्या कार्याचे तालुक्यातून कौतुक होत आहे




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पाण्याच्या डबक्यामध्ये मृतदेह सापडला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

भिंगारवाडी बस स्टॉपच्या जवळ मुंबई येथे पुणे हायवेच्या बाजूला पाण्याच्या डबक्यामध्ये बेशुद्ध अवस्थेत एक अनोळखी ईसम सापडून आला. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. या इसमाचे वय अंदाजे 35 ते 40 वर्ष असून उंची पाच फूट पाच इंच आहे. त्याचा चेहरा गोल असून दाढी, मिशा वाढलेल्या आहेत. अंगामध्ये फिकट हिरव्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट आणि काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातली आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक गोकुलदास मेश्राम यांच्याशी संपर्क साधावा.

## पोलीस प्रशासनाची पूर्वपरवानगी न घेता आंदोलन केल्याप्रकरणी 14 जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कंत्राटी कामगारांनी पोलीस प्रशासनाची परवानगी न घेता एकत्रित जमून कंपनीच्या विरोधात निषेध म्हणून ठिय्या आंदोलन केल्याप्रकरणी 14 जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 18 जून रोजी पुन्हा दाखल करण्यात आला. केम्स पॅक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड,तळोजा या कंपनीतील कंत्राटी कामगारांना कामावर घेतले नसल्याने ते गेट समोर ठिय्या आंदोलन करत आहेत. याबाबत पोलिसांनी त्यांना पोलिसांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही कृत्य करू नये यासाठी समज दिली होती. मात्र तरी देखील कामगारांनी कंपनी समोर ठिय्या आंदोलन चालू ठेवले होते. पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्याकडून 14 जून ते 28 जून पर्यंत पाच किंवा पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास व आंदोलन कार्यक्रमास मनाई करण्यात आलेली आहे. त्यानुसार मनाई आदेशाची समज देऊन सुद्धा कंत्राटी कामगारांनी पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता एकत्रित जमून कंपनी विरोधात निषेध ठिय्या आंदोलन केले.

## लाकडी दांडक्याने मारहाण केल्या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी सुरज म्हात्रे (खुटारी) आणि गोला यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 18 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. समीर एकनाथ कदम हे तळोजा फेस टू येथे राहत असून 17 जून रोजी घोट कॅम्प येथे सुरज म्हात्रे आणि गोला या दोघांनी गोला याचा मोबाईल कोणी घेतला व कोणाकडे आहे हे समीर कदम यांना माहीत असून याबाबत समीर कदम याने त्यांना माहिती दिली नाही याचा राग मनात धरून सुरज म्हात्रे याने लाकडी दांडक्याने मारहाण केली आणि गोला याने हाताबुकयाने मारहाण केली.

## स्टोअर रूम मधील साहित्याची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: तक्का येथील स्टोअर रूम मधील एक लाख 84 हजार रुपयांच्या साहित्याची चोरी केल्याप्रकरणी चोरांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. के मॉल, तक्का या ठिकाणी निलसिद्धी लाईफ स्पेस या नावाने कन्स्ट्रक्शनचे काम चालू होणार आहे. या ठिकाणी कन्स्ट्रक्शनचे साहित्य ठेवण्यासाठी पत्रा मारून स्टोअर रूम बनवले आहेत. तेथे बांधकामासाठी साहित्य ठेवले होते. स्टोअर रूमचे कडी कोयंडा तोडून चोरांनी आतील साहित्याची चोरी केली.

## कारचा दरवाजा अचानक उघडल्याने 62 वर्षीय ईसम जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कारचालकाने गाडीचा दरवाजा अचानक उघडल्याने मोटरसायकलला धक्का लागून 62 वर्षीय इसम खाली पडले आणि ते जखमी झाले. या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 17 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आनंदराव जाधव हे खारघर येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. ते नवरंग चौक येथे मिठाईच्या दुकानात जात असताना मेडिकलच्या समोर आले रस्त्याच्या कडेला चार चाकी गाडी उभी होती. ते गाडीच्या बाजूने जात असताना चालकाने अचानक दरवाजा उघडला. त्यामुळे त्यांच्या मोटरसायकलला दरवाजा लागून ते खाली पडले. त्यात त्यांच्या डोक्याला पायाला व खांद्याला मार लागला आणि ते जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## लॉटरी लागल्याचे सांगून 45 लाख 70 हजारांची फसवणूक, 19 जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल: वार्ताहर**

लॉटरी लागल्याचे भासवून लॉटरीची रक्कम मिळण्याकरता लागणारे फीची रक्कम भरावी लागेल असे सांगून 45 लाख 70 हजार 287 रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी 19 जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर सेक्टर 20 येथील 82 वर्षीय जेष्ठ नागरिक सेवानिवृत्त आहेत. 2023 मध्ये त्यांना एका इसमाने मेसेज पाठवला आणि पाच रुपयाच्या शंभर नोटांचे दोन लाख 98 हजार मिळतील असे सांगितले. त्यानुसार 14 अनोळखी इसमानी त्यांना व्हाट्सअप कॉल करून एकूण आठ लाख 70 हजार 287 रुपये भरण्यास भाग पडले. नोव्हेंबर 2024 मध्ये त्यांना दुबई येथे तीस लाखाची लॉटरी लागली असून ते पैसे मिळण्याकरता फी भरावी लागेल असे सांगितले. त्यानुसार पाच अनोळखी इसमानी त्यांना लॉटरीची रक्कम मिळण्याकरता वेगवेगळी कारणे सांगून पैशांची मागणी केली. त्यानुसार 82 वर्षीय ज्येष्ठाने 37 लाख रुपये त्यांच्या खात्यात जमा केले. अशी एकूण 45 लाख 70 हजार 287 रुपयांची फसवणूक करून लॉटरीची रक्कम दिली नाही आणि दिलेले पैसे परत केले नाहीत.

# योगाभ्यासामुळे होतात मासिक पाळीच्या तक्रारी दूर

### डॉ हिमानी गुप्ता, प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ञ, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

तुम्हाला माहित आहे का की नियमित योगासनांचा सराव केल्याने तुम्हाला मासिक पाळी संबंधीत समस्या तसेच वेदनांपासून दूर राहता येते. हार्मोन्स संतुलित होतात आणि मासिक पाळी दरम्यान आराम मिळतो. दर महिन्याला, अनेक महिलांना मासिक पाळी दरम्यान पेटके येणे, मूड स्विंग्ज, थकवा किंवा झोपेचा त्रास जाणवतो. यामुळे दैनंदिन जीवन कठीण होऊ शकते. तुम्हाला माहित आहे का की योगाभ्यास केल्याने वेदना कमी करता येतात आणि स्ट्रेचिंगने तणाव कमी करता येतो. व्यायाम हा तुम्हाला मासिक पाळीच्या तक्रारींपासून दूर ठेवण्यास मदत करतो.जर तुम्ही मासिक पाळीच्या दरम्यान कोणत्याही प्रकारचा व्यायाम करण्याचा विचार करत असाल तर योगाभ्यासाची निवड करणे योग्य राहिल. हे सर्वज्ञात आहे की योग तुमच्या अवयवांची बळकटी वाढवितो, पेटके येणे आणि पाठदुखी कमी करतो आणि मासिक पाळी दरम्यान अधिक आराम देते. जर तुम्ही नियमितपणे योग केला तर ते तुमचे हार्मोन्स संतुलित करतात, तुमची मासिक पाळी अधिक सुखकर करण्यास मदत करते. ते मूड स्विंग्सची समस्या दूर करते, तणाव कमी करते आणि तुम्हाला पुरेशी झोप घेण्यास मदत करते. योगामुळे रक्तप्रवाह आणि पचन सुधारते, त्यामुळे पोट फुगणे आणि अस्वस्थता कमी होते. यामुळे शारीरीक क्षमता, लवचिकता वाढते आणि तुम्हाला दर महिन्याला अधिक आरामदायी आणि संतुलित वाटण्यास मदत होते. ही अशी योगासने आहेत जी एक महिला तिच्या मासिक पाळीस आराम देण्याचा प्रयत्न करू शकते *सुप्त बद्ध कोणासन* : प्रथम, तुमच्या पाठीवर झोपा, तुमच्या पायांचे तळवे एकत्र आणा, गुडघे बाहेरच्या दिशेने खाली वाकवा. या योगासनांमुळे योगींच्या शरीरात नवीन ऊर्जा निर्माण होते, मज्जासंस्था बळकट होते. झुकलेले वळण (जठर परिवर्तनासन):* पाठीवर सरळ झोपणे. कमरेखाली एक लोड आडवा घेणे. दोन्ही हातांनी लोड व्यवस्थित घट्ट धरणे. जठर परिवर्तन व्यायामप्रकार करत असताना मानेवर, खांद्यावर किंवा कमरेवर चुकीचा ताण येऊ नये म्हणून कमरेखाली लोड दिला जातो. हे पचनक्रिया सुलभ करते आणि पाठदुखीपासून मुक्त होण्यास मदत करते. विपरित करणी* : विपरित क्रिया कशी करायची?१. भिंतीला चिटकून झोपा आणि दोन्ही पाय भिंतीवर ठेवून वर घ्या. ज्यामुळे "L" आकार तयार होते. यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत होते आणि शरीराला योग्य विश्रांती मिळते. शरीराला आराम मिळतो आणि तणावमुक्त राहण्यास मदत होते. ब्रिज पोज (सेतू बंधासन):* गुडघे वाकवून पाय नितंबांच्या जवळ आणा. श्वास घेताना, कंबर आणि नितंब वर उचला आणि ब्रिजसारखी (पुलासारखी) स्थिती तयार करा. खांदे आणि पाय जमिनीवर स्थिर ठेवा. काही वेळ या स्थितीत राहून श्वासोच्छ्वास सामान्य ठेवा. हळू हळू श्वास सोडत कंबर आणि नितंब जमिनीवर आणा. यामुळे तुमचे प्रजनन अवयवांचे आरोग्य आणि हार्मोनल संतुलन चांगले राहते. धनुरासन : धनुरासन करण्यासाठी, पोटावर झोपून गुडघे वाकवून हाताने घोटे धरा आणि श्वास घेताना छाती आणि पाय जमिनीवरून वर उचला. तुमचे शरीर धनुष्य सारखे वाकलेले दिसेल. हे मासिक पाळीच्या वेळी होणाऱ्या वेदना कमी करतात. लक्षात ठेवा, योग्य तंत्रांचा वापर करुन योगाभ्यास केला तर तुमच्या आरोग्यास भरपुर फायदे होतात. योग्याभ्यास करण्यापुर्वी तज्ज्ञांची मदत घ्या व त्यांच्या सल्ल्यानुसार योगाभ्यास करा.

# गोवंश तस्करी करणारे ऐन्ट्रा वाहन ताब्यात

### ५,५०,०००-/ मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव:-पेट्रोलिंग करीत असताना राळेगाव ते कळंब रोडवर एच पी पेट्रोल पंप जवळ एक इन्ट्रा पिकअप वाहन क्र. एम.एच. 34 बि. झेड. 3814 रोडने जात असताना वाहनाचे मागील बाजुस डाल्यामधे ०२ गोवंश जातीचे जनावरे दोरीने बांधुन दिसले. वरून सदर वाहन थांबवून पाहणी केली असता वाहनांमध्ये ५ इसम बसून होते,वाहन चालक मोहम्मद अलतमश मोहम्मद अनिस वय २३ वर्ष रा. दुधगाव ता. दारव्हा जि. यवतमाळ यास वाहनामधे असलेल्या गोवंश जनावरांचे वाहतुक परवाना, वैद्यकीय तपासणी व खरेदीचे कागदपत्र याबाबत विचारणा केली असता त्यांनी नसल्याचे सांगीतले असल्याने त्यांचेवर पोलिसांना संशय आल्याने सदर ठिकाणी हजर असलेले बजरंगदलचे प्रतीष्ठीत कार्यकर्ते यांच्या मदतीने सदर टाटा इन्द्रा पिकअप वाहन क्र. एम. एच. 34 बि. झेड. 3814 पाहाणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात पाट्यालावुन दोरी बांधुन सदर पाट्या व दोरी खोलुन पाहणी केली तर त्यामध्ये २ गोवंश जातीचे जनावरे दोरीने बांधुन चारा पाण्याची व्यवस्था न करता बांधुन कोंबुन असल्याचे दिसले व त्यांना कत्तली करिता घेवून जात असल्याचा संशय सदर असल्याने सदर वाहनातुन क्र.1) एक पांढ-या रंगाचा दोन अर्धवट शिंगे असलेली गोवंश जातीची पांढरा रंगाचा किंमत २५,०००/- रूपये (२) लाख्या रंगाचा दोन अर्ध शिंगे असलेला किंमत २५,०००/- रूपये असे एकुन ०२ नग गोवंश जातीचे जनावरे एकुन किंमत ५०,०००/- रूपये तसेच जनावरे वाहतुकी करीता वापरलेले एक सदर टाटा इन्ट्रा पिकअप वाहन क्र. एम.एच. 34 बि. झेड. 3814 किंमत ५,०००००/- रूपये असा एकुन ५,५०,०००/- रूपये चा मुद्देमाल जप्त करून आरोपी क्र. १) मोहम्मद अलतमश मोहम्मद अनिस वय २३ वर्ष २) मोहम्मद साकीब अदुल सईद वय २५ वर्ष, ३) शेख मोसिन शेख सलिम वय २६ वर्ष, ४) तनविर खान युनुस खान वय २४ वर्ष, ५) शारुख खान साहेब खान ३० वर्ष सर्व रा. दुधगाव ता. दारव्हा जि. यवतमाळ यांचे विरूद्ध प्राणी कायद्यावये गुन्हा नोंद करण्यात आला.सदर ची कार्यवाही मा. पोलिस निरिक्षक शितल मालटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर, पोलिस अंमलदार गोपाल वास्टर, सुरज चिव्हाने, विशाल कोवे यांनी केली असून बजरंग दल चे कार्यकर्ते यांनी सहकार्य केले.

# शुश्रुषा क्लिनिकचे प्रभाकर कांबळे यांच्या हस्ते उद्घाटन,डॉ. रवींद्र साखळकर जनतेला अल्प दरात सेवा देणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी**






डॉ.रविंद्र साखळकर यांच्या शुश्रुषा क्लिनिकचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट ) चे पनवेल महानगरपालिका जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या हस्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा न्यू पनवेल येथे आनंदमय वातावरणात सिद्धिविनायक इन्क्लेव्ह सेक्टर 9 न्यू पनवेल येथे संपन्न झाला डॉ.रविंद्र साखळकर हे अत्यंत कुशल वैद्यकीय व्यावसायिक आहेत, वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवाची संपत्ती त्यांच्याकडे आहे १९९७ मध्ये त्यांनी सायन मुंबई येथील प्रतिष्ठित लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज मधून वैद्यकीय पदवी पूर्ण केली. २००५ मध्ये,डॉ.रविंद्र साखळकर यांनी कामगार मंत्रालयाच्या सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट कडून ग्रॅज्युएशन प्रमाणन अभ्यासक्रम पूर्ण करून आपले कौशल्य पुढे कायम ठेवले सामान्य जनतेची सेवा व्हावी या दृष्टीने त्यांनी न्यू पनवेल मध्ये सेक्टर ९ या ठिकाणी शुश्रुषा क्लिनिकच्या माध्यमातून जनतेला अल्पदारात सेवा देण्याचा मानस त्यांनी उद्घाटन प्रसंगी बोलून दाखवला, उपस्थित मित्रपरिवार स्नेही व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉक्टर रविंद्र साखळकर यांच्या वैद्यकीय सेवेचे कौतुक करत शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले या उद्घाटन सोहळ्याला प्रभाकर कांबळे,अनिता साखळकर प्रकाश कांबळे,अरविंद शिंदे,चिंदरकर,नलिनीताई भाटकर देवा पवार, मुकुंद कांबळे, मीनाक्षी पोळ,विद्याताई ताटे,सुवर्णा पवार,मिलिंद तोटे,विजय कलोते, शेषराव वानखडे,जावळे,एन एम वाघमारेयासह भीम प्रेरणा सांस्कृतिक केंद्राचे अनेक सदस्य उपस्थित होतेडॉ. रवींद्र साखळकर.
प्रभाकर कांबळे साहेब.
प्रकाश कांबळे.
अरविंद शिंदे साहेब
चिंदरकर साहेब.
नलिनी ताई भाटकर.
देवा पवार.
मुकुंद कांबळे साहेब.
मीनाक्षी पोळ मॅडम.
विद्याताई ताटे मॅडम.
सुवर्णा पवार मॅडम.
मिलिंद लोंढे साहेब.
विजय कलोते.
शेषराव वानखेडे साहेब.
भीम प्रेरणा सांस्कृतिक केंद्राचे अनेक मान्यवर सदस्य.




दिनांक २०/०६/२०२५ शुक्रवार रोजी मा.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी पाटोदा तालुक्यातील जरेवाडी, कुसळंब व पाटोदा तहसीलला भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे, नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव, नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, न.प.सभापती रामेश्वर पंपु गोरे, जितेंद्र सांगळे, शहाबाज सय्यद, दत्ता साठे, अंगद सांगळे, बप्पा हुले सह इतर

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# जिल्ह्यातील वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांना व सुलभकांना १० दिवसाची अर्जित रजा मंजूर करण्याचे स्पष्ट आदेश व्हावे; शेख अब्दुल रहीम

दैनिक युवक आधार
वार्ताहर





"हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांचे शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्याकडे निवेदन सादर" छत्रपती संभाजीनगर: राज्य आणि जिल्ह्यातील शिक्षकांचे हक्क आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी आज छत्रपती संभाजीनगर शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांची भेट घेऊन यांच्याकडे एक महत्त्वाचे निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी सुलभक आणि प्रशिक्षणार्थी यांचे २६ मे ते १२ जून २०२५ दरम्यान झालेल्या वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना तसेच सुलभकांना १० दिवसांची अर्जित रजा मंजूर करून ती सेवापुस्तिकेत नोंदवावी अशी मागणी केली आहे. हे प्रशिक्षण दीर्घ / उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत घेण्यात आले असल्यामुळे, सुट्टीच्या वेळेसही शिक्षकांनी प्रशिक्षणास हजेरी लावून आपले कर्तव्य पार पाडले आहे. त्यामुळे या प्रशिक्षणाचा मोबदला म्हणून रजा देणे न्याय्य ठरेल, असे शेख अब्दुल रहीम यांनी निवेदनात नमूद केले आहे. ते पुढे म्हणतात की, ही मागणी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६(१८)(अ) नुसार करण्यात आली असून, संबंधित अधिकाऱ्यांना यासंबंधी आवश्यक निर्देश देण्याची गरज आहे. "शिक्षकांच्या हक्कांसाठी आम्ही सदैव सजग आहोत. त्यांना योग्य न्याय मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे," असेही शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्ट केले. हा निर्णय झाल्यास जिल्ह्यातील जवळपास 2 हजार शिक्षकांना न्याय मिळेल आणि त्यांच्या सेवापुस्तिकेतील योग्य नोंदीसंदर्भात एक सकारात्मक पाऊल ठरेल, अशी शिक्षक वर्गाची आशा आहे...

# विंचूर येथे जगदंबा माता मंदिर वर्धापना निमित्त दुर्गा सप्तशती पाठ

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर** - भवानी पेठ म्हणजे विंचूर गावातील प्रसिद्ध बाजारपेठ दर आठवड्याचा बाजार या ठिकाणीच भरतो. याच ठिकाणी 100 वर्षांपूर्वी ढवण परिवारातल्या पूर्वजानी जगदंबा मातेची स्थापना केली. आणि या ठिकाणी देवीचे मंदिर स्थापन झाल्यामुळे या परिसराला भवानी पेठ नावाने नंतर नावलौकिक मिळाला. ही मूर्ती अष्टदशभुजा आहे. सन 1983 पर्यंत चैत्र पौर्णिमेमध्ये गावामधून मिरवणूक निघत असे मागच्या वर्षी मूर्ती जिर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा समस्त ढवण परिवार, भवानी पेठ मित्र मंडळ व ग्रामस्थ विंचूर यांच्यावतीने तीन दिवस आयोजित करण्यातआला होता. आज पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 70 महिलांच्या उपस्थितीत मंदिरा समोर दुर्गा सप्तशती पाठ वाचन करण्यात आले. त्यानंतर सर्वांच्या उपस्थितीत देवीची आरती करण्यात आली व त्यानंतर सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.





# कोळेवाडी कराचा जगात डंका 'कॉमरेडस अल्ट्रा मॅरेथॉन २०२५ 'मध्ये भरारी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

कॉमरेड अल्ट्रा मॅरेथॉन २०२५ जागतिक दर्जाची मॅरेथॉन स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत भरवण्यात आली होती. माणसाच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक कणखरतेची आत्मपरीक्षा पाहणारी स्पर्धा म्हणून कॉमरेड मॅरेथॉन प्रसिद्ध आहे. ही स्पर्धा पूर्ण करणे हे प्रत्येक धावकाचे स्वप्न असते. भारतातील नावाजलेले मत्स्य उद्योजक *कृष्णा गोसावी* या कोळीवाडीच्या सुपुत्राने ही स्पर्धा पूर्ण करण्याचे स्वप्न पाहिले. खरंतर कृष्णा गोसावी तालुका कराड येथील कोळेवाडीच्या डोंगर भागात जन्मलेले, करी कपाऱ्यातून धावण्याचा सराव असलेले व डोंगरकपाऱ्यातून वाट काढत धावण्याचे बाळकडू लहानपणापासून असल्यामुळे धावण्यामध्ये अगोदरच तरबेज होते. ते सध्या व्यवसायानिमित्त नवी मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांनी मॅरेथॉन साठी नवी मुंबई येथे त्यांचे कोच अमितकुमार यादव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण चालू केले. त्यासाठी लागणाऱ्या सर्व अटींची पूर्तता केली स्वतःला सिद्ध केले आणि म्हणूनच त्यांना दक्षिण



आफ्रिकेत धावण्याच्या स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली.

८ जून रोजी पहाटे ५.३० वाजता सुरू झालेली ही थरारक स्पर्धा पीटरमारीटझबर्ग येथे सुरू होऊन डर्बन येथे संपली.९० किमी डोंगररांगा, नदी ,नाले या सगळ्यावर मात करून अखेर कॉमरेड अल्ट्रा मॅरेथॉन २०२५ जागतिक स्पर्धा पूर्ण केली. अवघ्या १० तास ३२ मिनिटे असा थरारक प्रवास करत ९० किलोमीटर अंतर धावत पार करून जागतिक स्पर्धेत कृष्णा गोसावी यांनी आपला ठसा उमटवला.

यावर्षीच्या स्पर्धेत ८० पेक्षा जास्त देशांनी सहभाग घेऊन २४००० स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेमध्ये ४१५ भारतीय स्पर्धक असून त्यामध्ये १६० महाराष्ट्रीयन धावपटूंनी अग्रेसर भूमिका बजावली होती.

कोळेवाडीचे कृष्णा गोसावी (मत्स्यव्यवसाय उद्योजक) नवी मुंबई येथे कार्यरत असून त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील मॅरेथॉन मध्ये कराड तालुक्याचा नावलौकिक वाढवला. त्याच बरोबर कराडचे महाजन हॉस्पिटल चे डॉक्टर महाजन व संदीप पाटील यांनीही या स्पर्धेत भाग घेऊन कराडचे नावलौकिक वाढवला आहे. तसेच कृष्णा यांना अमित कुमार यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर त्यांच्यासह त्यांच्या हॅप्पी फिट चॅम्पियन्स या समूहातील खेळाडूंनी यशस्वीरीत्या ही स्पर्धा पूर्ण केली. त्यांच्या समूहाकडून गोसावी यांचे कौतुक केले जात आहे. त्यांच्या या स्पर्धेतील यशाचे कराड तालुक्यातील अनेक मान्यवर, हितचिंतक व कोळेवाडीतील ग्रामस्थ यांनी तोंड भरून कौतुक केले आहे.